**विद्यापीठ अनुदान आयोगाने दि.३० जून, २०१० च्या अधिसूचनेन्वये शिक्षक व समकक्ष पदांवरील नियुक्त्या सदर पदाचे किमान शैक्षणिक अर्हता, वेतनश्रेण्या , अनुषंगिक लाभ, प्रोत्साहनपर वेतनवाढी इत्यादी बाबीं संदर्भात निर्गमित केलेले आदेश राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व समकक्ष पदांना लागू करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र.संकीर्ण -२०११/(२५/११)विशि-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक : १५ फेब्रुवारी , २०११

वाचा -
१) भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास विभागाचे पत्र क्र.1-32/2006-U-II/U.I(i) दि. ३१ डिसेंबर, २००८
२) शासन निर्णय क्र.एनजीसी-२००९/(२४३/०९)विशि-१, दि.१२ ऑगस्ट, २००९
३) विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना क्र. F-3.1/2009 दि.३० जून, २०१०
४) भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास विभागाचे पत्र क्र.F.1-7/2010-U-II दि. ११ मे २०१०
५) भारत सरकारचे राजपत्र दि.१८-२४ सप्टेंबर, २०१०

**प्रस्तावना :** विद्यापीठ अनुदान आयोगाने संदर्भाधीन क्र.३ येथील दि.३० जून, २०१० च्या अधिसूचनेन्वये केंद्रीय विद्यापीठे व महाविद्यालय / संस्था मधील शिक्षक व समकक्ष पदांवरील नियुक्त्या सदर पदाचे किमान शैक्षणिक अर्हता, इत्यादी निश्चित केलेल्या आहेत. तसेच सदर पदावरील अध्यापकांच्या वेतनश्रेण्या , अनुषंगिक लाभ, प्रोत्साहनपर वेतनवाढी इत्यादी बाबतीतही निदेश दिलेले आहेत.

२. विद्यापीठ अनुदान आयोगाची उक्त दि.३० जून, २०१० ची अधिसूचना केंद्रशासनाच्या दि.१८-२४ सप्टेंबर, २०१० च्या राजपत्रात प्रसिध्द झालेली आहे. सदर अधिसूचनेतील उक्त बाबी राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकीय व शिक्षक समकक्ष पदाच्या संदर्भात लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

३. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.३० जून, २०१० च्या अधिसूचनेतील शिफारशी / निर्देश याबाबत साकल्याने विचार करुन त्या संदर्भात शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

| अ. क्र. | विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.३० जून, २०१० च्या अधिसूचनेतील परिच्छेद क्र. | शासन आदेश |
|---|---|---|
| १. | **परि.क्र.२** | केंद्र शासनाच्या मनुष्य बळ विकास मंत्रालयाने दि.३१ डिसेंबर, २००८ रोजी निर्गमित केलेल्या आदेशास अनुसरुन राज्य शासनाने दि.१२ ऑगस्ट, २००९ रोजी निर्गमित केलेले आदेश लागू राहतील. |

| | | |
|---|---|---|
| २. | **परि.क्र.२.३.०** | केंद्र शासनाच्या मनुष्य बळ विकास मंत्रालयाने दि.३१ डिसेंबर, २००८ रोजी निर्गमित केलेल्या आदेशास अनुसरुन राज्य शासनाने दि.१२ ऑगस्ट, २००९ रोजी निर्गमित केलेले आदेश लागू राहतील. |
| ३. | **परि.क्र.३.०.०** | या परिच्छेदातील सर्व उपपरिच्छेद म्हणजे ३.१.० ते ३.९.० येथील सर्व बाबी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत. |
| ४. | **परि.क्र.४.०.४** | या परिच्छेदातील सर्व उपपरिच्छेद म्हणजे ४.१.० ते ४.४.२.३ येथील सर्व बाबी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत. |
| ५. | **परि.क्र.४.४.७** | या परिच्छेदातील सर्व बाबी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत. |
| ६. | **परि.क्र.४.५.०** | या परिच्छेदातील सर्व उपपरिच्छेद म्हणजे ४.५.० ते ४.५.३ येथील सर्व बाबी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत. |
| ७ | **परि.क्र.४.६.० व ४.७** | या परिच्छेदातील सर्व उपपरिच्छेद म्हणजे ४.६.० ते ४.६.४ व ४.७ येथील सर्व बाबी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत. |
| ८. | **परि.क्र.५.०.०** | या परिच्छेदातील सर्व उपपरिच्छेद म्हणजे ५.०.० ते ५.१.७ येथील सर्व बाबी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत. |
| ९. | **परि.क्र.६.०.०** | या परिच्छेदातील सर्व उपपरिच्छेद म्हणजे ६.०.० ते ६.३.१२ येथील सर्व बाबी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत. |
| १०. | **परि.क्र.६.४.०** | या परिच्छेदातील सर्व उपपरिच्छेद म्हणजे ६.४.० ते ६.४.११ येथील सर्व बाबी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत.<br>तथापि, राज्यातील बिगर नेट / सेट अधिव्याख्यात्यांना CAS अंतर्गतचे लाभ देण्यात येऊ नयेत असा निर्णय यापूर्वीच दि.१८.१०.२००१ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर लाभ अशा अधिव्याख्यात्यांना अनुज्ञेय असणार नाहीत. |
| ११. | **परि.क्र.६.५.०** | या संदर्भात शासन निर्णय क्र.एनजीसी -२०१०/ (४१५/१०) विशि-१ दि.३० जुलै, २०१० अन्वये निर्गमित केलेले आदेश लागू राहतील. |
| १२. | **परि.क्र.६.६.०** | या परिच्छेदातील सर्व उपपरिच्छेद म्हणजे ६.६.० ते ६.६.५ येथील सर्व बाबी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत. |
| १३. | **परि.क्र.६.७.०** | या परिच्छेदातील सर्व उपपरिच्छेद म्हणजे ६.७.० ते ६.७.१ येथील सर्व बाबी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत. |
| १४. | **परि.क्र.६.८.०** | या परिच्छेदातील सर्व बाबी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत. |
| १५. | **परि.क्र.८.०** | केंद्र शासनाच्या मनुष्य बळ विकास मंत्रालयाने दि.३१ डिसेंबर, २००८ रोजी निर्गमित केलेल्या आदेशास अनुसरुन राज्य शासनाने दि.१२ ऑगस्ट, २००९ रोजी निर्गमित केलेल्या आदेशामधील अनुज्ञेय करण्यात आलेल्या रजाच लागू राहतील |
| १६. | **परि.क्र.१०.०** | या परिच्छेदातील सर्व उपपरिच्छेद म्हणजे १०.० ते १०.१ येथील सर्व बाबी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत. |
| १७. | **परि.क्र.११.०** | या परिच्छेदातील सर्व उपपरिच्छेद म्हणजे ११.० ते ११.५ येथील सर्व बाबी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत |
| १८. | **परि.क्र.१२.०** | या परिच्छेदातील सर्व उपपरिच्छेद म्हणजे १२.० ते १२.२ येथील सर्व बाबी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत |
| १९. | **परि.क्र.१३.०** | या परिच्छेदातील सर्व उपपरिच्छेद म्हणजे १३.० ते १३.१ येथील सर्व बाबी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत |
| २०. | **परि.क्र. १४.०** | या परिच्छेदातील सर्व उपपरिच्छेद म्हणजे १४.० ते १४.२ येथील सर्व बाबी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत |

| | | |
|---|---|---|
| २१. | **परि.क्र.१५.०** | या परिच्छेदातील सर्व उपपरिच्छेद म्हणजे १५.० ते १५.२ येथील सर्व बाबी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत |
| २२. | **परि.क्र.१६.०** | या परिच्छेदातील सर्व उपपरिच्छेद म्हणजे १६.० ते १६.३ येथील सर्व बाबी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत |
| २३. | **परि.क्र.१७.०** | या परिच्छेदातील सर्व उपपरिच्छेद म्हणजे १७.० ते १७(I) - (VII) येथील सर्व बाबी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत |

४. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिसूचनेन्वये विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये / संस्थांमधील शिक्षक व समकक्ष पदावरील नियुक्त्या, सदर पदांची शैक्षणिक अर्हता व सेवांतर्गत प्रगती योजना (Carrier Advancement Scheme) राबविण्यासाठी उक्त दि.३० जून, २०१० च्या **अधिसूचनेमधील परि.६.८.० मध्ये** नमूद केल्याप्रमाणे सोबतच्या अनुसूची (Schedule) अन्वये केलेल्या शिफारशी / मुद्दयांबाबत साकल्याने विचार करुन त्या संदर्भात शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

| **अ.क्र.** | **विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.३० जून, २०१० च्या अधिसूचने सोबतच्या अनुसूचीतील मुद्दा क्र.** | **शासन आदेश** |
|---|---|---|
| १. | **मुद्दा क्र. १ ते ४ व ६ ते ९** | केंद्र शासनाच्या मनुष्य बळ विकास मंत्रालयाने दि.३१ डिसेंबर, २००८ रोजी निर्गमित केलेल्या आदेशास अनुसरुन राज्य शासनाने दि.१२ ऑगस्ट, २००९ रोजी निर्गमित केलेले आदेश लागू केले आहेत. त्यामुळे सदर मुद्दयातील सर्व बाबी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत. |
| २. | **मुद्दा क्र.१०.०** | या मुद्दयातील १०.० ते १०.५ येथील सर्व बाबी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत |
| ३. | **मुद्दा क्र.११.०** | केंद्र शासनाच्या मनुष्य बळ विकास मंत्रालयाने दि.३१ डिसेंबर, २००८ रोजी निर्गमित केलेल्या आदेशास अनुसरुन राज्य शासनाने दि.१२ ऑगस्ट, २००९ रोजी निर्गमित केलेल्या आदेशामधील अनुज्ञेय करण्यात आलेले भत्तेच लागू राहतील |

५. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (विनियम २०१०) दि.३० जून, २०१० च्या अधिसूचनेमधील परि.६.८.० अन्वये केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने तद्वतच परि.१५.१ मध्ये सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक यांच्या आठवडयातील तसेच शैक्षणिक वर्षातील कार्यभाराचे तास निश्चित केले असून, परि. १५.२ अन्वये जे प्राध्यापक (Professor ) विस्तार सेवा ( Extension Activities ) व प्रशासन विषयक कामकाजासाठी व्यतित करतात त्यांना एकूण तासांपैकी २ तास एवढी सूट (Relaxation) देण्यात आलेली आहे. तथापि, **प्राचार्यांबाबत अशाप्रकारच्या तासिकांचा अथवा कार्यभारांचे (Workload) तास निश्चित करण्याचे निर्देश सदर अधिसूचनेमध्ये किंवा परि.६.८.० च्या अनुसूचीमधील परि.५.१ किंवा ५.२ मध्ये देण्यात आलेले नाहीत.**

**त्यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाकडून प्राचार्यांना आठवडयातील तसेच शैक्षणिक वर्षातील कार्यभाराच्या तासांचे निश्चित निर्देश देण्यात आले नसल्यामुळे त्यांना विवक्षित तासिका घेण्यापासून सूट देण्यात येत आहे.**

६. सदर आदेशाची अंमलबजावणी दि.३० जून, २०१० पासून पूर्वलक्षी प्रभावाने करण्यात यावी.

७. सदर अधिसूचनेच्या परिच्छेद क्र.४.२.० (iii) मध्ये प्राचार्य पदासाठी एकूण १५ वर्षांचा अनुभव विहित केलेला आहे. सदर अनुभवाची अट मात्र सदरचे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू राहील.

८. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.३० जून, २०१० च्या विनियमातील (Regulations) परिच्छेद क्र.७.४.० मध्ये दिलेल्या निर्देशानुसार अकृषि विद्यापीठांनी या संदर्भात त्यांच्या **परिनियमांमध्ये (Statutes)** आवश्यक त्या सुधारणा विहित मुदतीत कराव्यात. तसेच सदर विनियमांच्या अनुषंगाने विद्यापीठ अधिनियमांमध्ये करावयाच्या सुधारणांचा प्रस्ताव अकृषि विद्यापीठांनी संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत त्वरीत सदर करावा.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharastra.govt.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्यांचा संकेताक क्रमांक २०११०२१५१४२७३०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

( विकास तु. कदम )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे
३) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे
५) सर्व अकृषि विद्यापीठांचे संचालक, बी.सी.यु.डी.
६) महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) मुंबई
७) महालेखापाल-२, महाराष्ट्र (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) नागपूर
८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१०) मा. मंत्री ,(उ.व तं.शि), यांचे खाजगी सचिव
११) मा. राज्यमंत्री, (उ.व तं. शि.), यांचे खाजगी सचिव.
१२) मा.सचिव , उच्च व तंत्रशिक्षण यांचे स्वीय सहाय्यक
१३) सर्व सहसचिव / उपसचिव / अवर सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग
१४) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५) संचालक, तंत्रशिक्षण / व्यवसाय शिक्षण / कला / ग्रंथालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१६) संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१७) सर्व सहसंचालक, उच्च शिक्षण / तंत्रशिक्षण /व्यवसाय शिक्षण / कला / ग्रंथालय,
१८) सर्व कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग
१९) निवड धारिका विशि-३